# मराठी स्त्री आत्मकथनांचा अभ्यास
# सन 2000 ते 2010



प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील

**Kripa Drishti Publications, Pune.**

# मराठी स्त्री आत्मकथनांचा अभ्यास सन 2000 ते 2010

प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील

**Kripa-Drishti Publications, Pune.**

Book Title: मराठी स्त्री आत्मकथनांचा अभ्यास
सन 2000 ते 2010

Author By: **प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील**

1st Edition
ISBN: **978-1-7947-8091-0**

9 781794 780910

Published: **August 2020**

**Publisher:**

KRIPA DRISHTI PUBLICATIONS

**Kripa-Drishti Publications**
A/ 503, Poorva Height, SNO 148/1A/1/1A,
Sus Road, Pashan- 411021, Pune,
Maharashtra, India.
Mob: +91-8007068686
Email: editor@kdpublications.in
Web: https://www.kdpublications.in

© **Copyright प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील**

All Rights Reserved. No part of this publication can be stored in any retrieval system or reproduced in any form or by any means without the prior written permission of the publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions reached, etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

# ऋणनिदैश

नाशिक प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पुनित झालेली भूमी कवी कुसुमाग्रज, नाटककार वसंत कानेटकर, चित्रपटमहर्षी दादासाहेब फाळके, क्रांतिकारक तथा लेखक वि दा सावरकर यांच्या साहित्याची कर्मभूमी हीच नाशिक नगरीच, राजकवी चंद्रशेखर स्मृती-चित्रकार लक्ष्मीबाई टिळक, रेव्हरंड टिळक, साम्यवादाचे जनक कॉम्रेड श्रीपाद डांगे, जलसाकार भीमराव कर्डक, मुक्त शाहिरीकार प्रताप परदेशी, गीतकार योगेश्वर अभ्यंकर, कवी गोपाळ देशपांडे, लावणीकर पंढरीनाथ सोनवणी, काव्य बहरणारे कवी अरुण काळे, कवी किशोर पाठक, कवी आनंद जोर्वेकर या महान तपस्वीचं साहित्य याच नाशिक नगरीतच बहरल याचा नक्कीच नाशिककरानं अभिमान आहे.

तपोभुमी औद्योगिक धार्मिक भूमी असणाऱ्या नाशिक जवळच्या त्र्यंबकेश्वरच्या निसर्गसानिध्यात माझं बालपण गेलं. प्राथमिक अन माध्यमिक शिक्षण ही येथेच झालं बारावीनंतर डी. एड. पूर्ण केल्यानंतर नाशिकच्या मातोश्री सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यामंदिरात उपशिक्षिका म्हणून् सेवेला प्रारंभ केला. ज्योती स्टोअर्स आयोजित लेखक तुमच्या भेटीला कार्यक्रमाअंतर्गत प्रसिद्ध कवी श्री प्रवीण दवणे याचं व्याख्यान ऐकण्याचा योग आला त्यांचं ते अभ्यासपूर्ण व्याख्यान ऐकल्याण साहजिकच वाचण्याची गोडी निर्माण झाली. नाशिक मधील प्रसिद्ध लेखिका तथा प्राचार्य वेदश्री थिगळे यांनाही भेटण्याचा योग आला यातच स्नेहाचा अखंड धागा निर्माण होत

त्याच माझ्या प्रेरक शक्ती झाल्या. त्यांनीच माझी प्रतिभाशक्ती जागवत लेखनास प्रोत्साहन दिले 2000 ते 2010 या दशकातील मराठी स्त्री आत्मकथनाचा अभ्यास हा माझा पी.एचडी प्रबंध यांच्याच अनमोल मार्गदर्शनाने मला 2014 साली पूर्ण करता आला. आज त्याला पुस्तक रूपही त्यांच्याच प्रेरणेने मिळाले. त्यांचे हे ऋण न फिटण्यासारखे त्यांचे मनापासून आभार.

शिक्षण पूर्ण केल्यानंतर नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य अशा महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कार्यरत आहे. संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री प्रशांतदादा हिरे समन्वयक माजी आमदार डॉ. अपूर्वभाऊ हिरे यांनी अध्ययनाची संधी देत संशोधन कार्यातही संधी दिली. त्यामुळे त्यांची मी सतत ऋणी राहिलच मोलाचे सहकार्य प्राचार्य डॉ सौ उज्वला देवरे, प्राचार्य शिरुडे सर यांचेही मनापासून आभार.

माझ्या शैक्षणिक प्रवासात माझ्या कुटुंबाचा अनमोल वाटा आहेत माझे पती श्री. मोहन माळी यांची प्रेरणादायी साथ मिळाली पण त्याच बरोबर माझे वडील श्री पुंडलिक अमृत पाटील आई सौ सुमन पुंडलिक पाटील सासरे श्री बाजीराव माळी सासूबाई सौ जनाबाई माळी यांचे आशीर्वाद अनमोल असेच आहे माझे भाऊ श्री संजय पाटील श्री योगेश पाटील थोरली बहीण विद्या महाजन दाजी श्री सुनील महाजन यांचे प्रोत्साहन व आशीर्वादाने हा लेखन-प्रपंच मी करू शकले माझी मुले नचिकेत व सावित्री यांचे योगदान या प्रबंधाचे संगणकीय मुद्रणाचे काम करणारे परमस्नेही श्री विजयकुमार इंगळे यांनी अल्पावधीतच सुबक शैलीत करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार.

प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अशा कितीतरी सहृदयी व्यक्तीचे उदा. प्रा. विनोद गोरवाडकर, व इतर सर्वांचे आभार.

या पुस्तकातील स्त्रियांनी लिहिलेली ही आत्मचरित्रे एक प्रेरक म्हणून आजच्या पिढीला आत्मभान अन् नवदिशा देण्याचे काम नक्कीच करत राहील. यात शंकाच नाही माझ्या या पुस्तकाचे आपण सर्व नक्कीच स्वागत कराल.

**प्रा. डॉ. मीनाक्षी पाटील**

महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला

महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, मालेगाव.

# प्रस्तावना

किती जळाल्या

किती विझवल्या

याचा हिशोब नाही

पण माझ्यातली जळणारी बाई

अजूनही दिसत नाही

आजच्या आधुनिक युगातही 'स्त्री जन्मा तुझी कहाणी' असेच म्हणावे लागले. स्त्री अन स्त्री-मुक्ती यांच्या आपण कितीही वल्गना केल्या तरी स्त्री समस्यांच्या बेडीत अन अंत्यसंस्काराच्या पुडीत अजून तशीच बंदिस्त आहे. १८४८ साली क्रांतीसूर्य महात्मा फुले अन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचे द्वारा खुले करून स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले ही एक मोठी क्रांती स्त्री जीवनाला आकार देणारी ठरली आत्मज्ञान निर्माण होण्यास त्या निमित्ताने मदत झाली. आजच्या आधुनिक अन माहिती तंत्रज्ञानाच्या युगात एका बाजुला स्त्रीला सर्वस्व माणन आणि दुसऱ्या बाजूला स्त्रीची अवहेलना, हेळसांड दुय्यमत्व व तिचे नगण्य महत्त्व या बाजूही प्रकर्षाने लक्षात येतात कारण पुरुषसत्ताक संस्कृती होय.

स्त्री जीवनात विसाव्या शतकात मोठ्या प्रमाणात बदल झाले राजकारण, अर्थकारण, समाजकारण, कौटुंबिक जबाबदाऱ्या इ सर्वच

क्षेत्रात स्त्रिया समर्थपणे जबाबदाऱ्या पेलताना दिसत आहे. आजची स्त्री गृहिणी असली तरी बहुश्रुत झालेली आहे. आजच्या युगातील स्त्री विचारी आहे. ती काळानुरूप बदलू पाहत आहे. म्हणूनच आजच्या स्त्रीचा मार्ग हा विकासाकडे, प्रगतीकडे आणि वैभवाकडे जात आहे. सर्वच क्षेत्र स्त्रीने आज कवेत घेतली आहे. शैक्षणिक प्रवाहात स्त्री आल्यामुळे ती आत्मनिर्भर बनली कुंटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या बाबतीत स्वतंत्र झाली. व्यावहारिक दृष्टी विकसित झाल्यामुळे तत्कालीन समाज व्यवस्था ही बदलली नव्हे तिने ती बदलवली, पुरुषांचे हक्काचे विषय क्षेत्र किंवा ज्या क्षेत्रावर पुरुषांची मक्तेदारी राहत आलेली आहे त्या सर्व क्षेत्राशी निगडित झाली हे मात्र खरे.

सन १९७५ हे स्त्री मुक्ती वर्ष जाहीर झाल्या नंतर स्त्री लेखिकांना आपले चरित्र लिहिण्याच्या प्रेरणा मिळत गेल्या आणि विविध क्षेत्रातील स्त्रियांनी आपले आत्मचरित्र लिहिले १९७५ च्या आधी आत्मकथानमागच्या भूमिका वेगळ्या होत्या आणि १९७५ नंतर स्त्री आत्मचरित्रकरांच्या भूमिका नेहमीच्या वर्तुळातून बाहेर पडून स्वतःचा शोध घेण्याच्या एक वेगळा प्रयत्न केला आहे. या काळामध्ये आत्मकथने उत्कट अनुभव कथनासाठी लिहिली गेली. आहेतच पण स्वतःच् अस्तित्व स्वतःचे सामाजिक स्थान संसारातील आणि पतीच्या आयुष्यातील स्वतःची निश्चित अशी भूमिका या सगळ्यांच दर्शन तिने घडवले आहे.

प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलीक पाटील लिखित 2000 ते 2010 या दशकातील मराठी स्त्री आत्मकथनचा अभ्यास या पुस्तकात कुणास्तव कुणीतरी (यशोदा पाडगावकर) 2000 समिधा (साधना आमटे) 2001 चाकाची खुर्ची (नसीमा हुरजूक) 2001 आयदान (उर्मिला पवार) 2003 हृद्यस्थ (अलका मांडके) 2004 योगा योग (उर्षा दर्डा) 2004

जॅकपॉट (सरिता वाकलकर) 2007 भोगले जे दुःख त्याला (आशा अपराध) 2008 संग्राम (सीमा साखरे) 2008 बारबाला (वैशाली हळदणकर) 2008 मेरीगोल्ड (मंदाकिनी जाधव मेहता) 2009 मी नंदा (नंदा मेश्रास) 2009 मास्तरांची सावली (कृष्णाबाई सुर्वे) 2009 धाकट्या नजरेतून (अलका गोडे) 2010 सर आणि मी (ज्योत्स्ना संभाजी कदम) 2010 या सर्व आत्मकथनांचा वाङ्मयीन स्वरूप, वाङ्मयीन गुणविशेष स्त्री-पुरुष असमानता, स्त्री-पुरुष संघर्ष, लेखिकाचे जीवनारूप या दृष्टिकोनातून केलेला अभ्यास आत्मकथनाच्या सर्व कसोट्या पूर्ण करणारे आहे एका वेगळ्या विषयाला लेखिका प्रा डॉ मीनाक्षी पाटील यांनी स्वतःची प्रतिभाशैली जपत वाचकांनाही चिंतन करायला भाग पाडले आहे हे नक्की.

आत्मकथन लिहिणाऱ्या स्त्रिया या वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या असून प्रत्येकीचा लेखनाचा उद्देश मात्र वेगवेगळा आहे. या सर्व आत्मकथनातून २१ व्या शतकातील समाजाचे व संस्कृतीचे दर्शन होते. प्रा. डॉ. मीनाक्षी पाटील यांनी स्री पुरुषांचे परस्परांशी असणारे नाते तपासून पाहत वास्तव परिस्थितीचे दर्शन या आत्मकथनांच्या अभ्यासातून वाचकांना करून देत विचारही करायला लावला आहे. भिन्न प्रवृत्तीच्या भिन्न कुटुंबामधून आलेल्या काही मराठी सारस्वतातील मानकऱ्यांच्या सहचारिणी असलेल्या स्त्रियांची हि आत्मचरित्र आयुष्यातील अनेक प्रसंगातील हार स्विकारत अनेक भावनांच्या भावछटांशी रंगलेली ही आत्मचरित्रे आत्मकथन, आत्मनिर्भरता निर्माण करणारी वाटतात हे नक्की.

व्यक्ती आणि समाज यांच्यामधले नाते हे त्यांच्या बहुविध सूक्ष्मातिसूक्ष्म धाग्यांनी घट्ट विणले गेले असले तरी ज्या संस्कृतीत बाई म्हणजे चुलीतले लाकूड, पुरुषांची अनुगामिनी त्याला वंशाचा दिवा देणारी कूस, कुटुंब व्यवस्थेची आधारशीला आणि धर्म, नाती वर्गाच्या भिंती मजबूत राखणारी कुंपनकाठी असे समजण्याची परंपरा आहे. अशा अवस्थेत नवी परंपरा अन परिवर्तनाची क्षमता निर्माण करण्याची उमेद ही आत्मकथने नक्कीच करतात. त्यामुळे ही आत्मकथने काळाची सामाजिक व्यवस्था मांडणारे दस्तऐवज वाटतात.

आत्मभानाची वीज जेव्हा बाईमध्ये सळसळते तेव्हा अचेतनेची अंधाराची मुकसंस्कृतीची किती क्षितिजे उजागर होतात याचेच प्रत्यंतर प्रस्तुत अभ्यासातून लेखिकेने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण वाचक त्याचा आनंदाने स्विकार करतील यात शंकाच नाही. २००० ते २०१० या कालखंडातील आत्मकथनामधून स्रीचा आत्माधिकार निर्माण करणारी आहे. आजच्या स्री जीवनाला नाविण्याचा शोध घेत नवीन बळ, नवीन दिशा अन नवऊर्जा देण्याचे काम करत राहील. लेखिका प्रा डॉ. मीनाक्षी पाटील यांच्या या लेखन प्रवासाचे मनापासून स्वागत करते.

**प्राचार्य. डॉ. वेदश्री थिगळे.**

# अनुक्रमणिका


प्रकरण 1: आत्मकथन : संज्ञा, स्वरूप व विकास........................................ 1
१.१ आत्मचरित्र व आत्मकथन यातील फरक: ................................................ 5
१.२ आत्मकथनांचे स्वरूप व वैशिष्ट्ये : ........................................................ 6
१.३ 'स्त्री' आत्मकथनांची परंपरा व प्रेरणा:.................................................... 9
१.४ सन २००० ते २०१० ह्या दशकातील आत्मकथनांचा विकासात्मक आढावा: ....... 11
प्रकरण 2: आत्मकथनांतील स्त्री पुरुष समानता....................................... 18
२.१ स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरूप: ......................................................... 19
२.२ स्त्री पुरुष समानता : स्त्रीवादाची मागणी :............................................. 21
२.३ आत्मकथनातील स्त्री पुरुष समानतेचे दर्शन:.......................................... 21
२.३.१ कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक स्तरावरील स्त्री-पुरुष समानतेचे दर्शन:.... 22
२.४ स्त्री-पुरुष सुसंवाद: ........................................................................ 28
प्रकरण 3: आत्मकथनांतील स्त्री-पुरुष संघर्ष............................................ 35
३.१ स्त्री जाणीवेचा शोध:......................................................................... 35
३.२ कौटुंबिक स्तरावरील स्त्री-पुरुष संघर्ष:.................................................. 39
३.३ सामाजिक व सांस्कृतिक स्तरावरील स्त्री-पुरुष संघर्ष : ............................ 54
३.४ शैक्षणिक व व्यावसायिक स्तरावरील स्त्री-पुरुष संघर्ष: .............................. 61
३.५ स्त्री-पुरुष संघर्षाचे बदलते स्वरूप: ..................................................... 73
प्रकरण 4: आधुनिक स्त्री जीवनानुभवाची विविधता.................................. 85
४.१ स्त्री जीवनाची सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी:.................................. 85
४.१.१ वेदकालीन स्त्रियांची स्थिती: ........................................................... 86
४.१.२ स्मृतिकालीन स्त्रियांची स्थिती: ........................................................ 86
४.१.३ मध्ययुगीन स्त्रियांची स्थिती:........................................................... 87
४.१.४ ब्रिटीशकालीन स्त्रियांची स्थिती: ...................................................... 87
४.२ स्त्री जीवनात शैक्षणिक स्तरावरून बदल:............................................... 87
४.२.१ स्त्रीजीवनात सामाजिक स्तरावरून बदल:.............................................. 88
४.२.२ स्त्री जीवनात राजकीय स्तरावरून बदल: .............................................. 89
४.२.३ स्त्रीजीवनात औद्योगिक स्तरावरून बदल: ............................................ 89

४.३ स्त्री मुक्ती चळवळः ....................................................................90
४.४ स्त्रियांच्या संदर्भातील विविध कायदेः ...................................................91
४.५ एकविसाव्या शतकातील स्त्री जीवनः ....................................................92
४.५.१ शिक्षणक्षेत्रातील स्त्रियांचे कार्य:.........................................................93
४.५.२ साहित्यक्षेत्रातील स्त्रियांचे कार्य: .......................................................93
४.५.३ कला क्षेत्रातील स्त्रियांचे कार्य:..........................................................94
४.५.४ क्रीडा क्षेत्रातील स्त्रियांचे कार्य: .........................................................95
४.५.५ राजकीय क्षेत्रातील स्त्रियांचे कार्य: ....................................................95
४.६ प्रस्तुत आत्मकथनांतील स्त्रीदर्शन :..........................................................96
४.७ जागतिकीकरण व स्त्री:.......................................................................102
४.८ स्त्रिया व अर्थव्यवस्थाः......................................................................102
४.९ जागतिकीकरणाचा स्त्री जीवनावर होणारा परिणामः ................................104
४.१० आत्मकथनांतील स्त्री जीवनानुभवाची विविधता:...................................107
४.१०.१ साधना आमटे यांचे जीवनानुभवः ....................................................109
४.१०.२ यशोदा पाडगावकर यांचे जीवनानुभव :...........................................112
४.१०.३ कृष्णाबाई सुर्वे यांचे जीवनानुभव : .................................................114
४.१०.४ नंदा मेश्राम यांचे जीवनानुभवः ......................................................116
४.१०.५ डॉ. अलका मांडके यांचे जीवनानुभवः..............................................118
४.१०.६ वैशाली हळदणकर यांचे जीवनानुभवः ............................................120
४.१०.७ नसीमा हुरजूक यांचे जीवनानुभवः .................................................122
४.१०.८ सरिता वाकलकरांचे जीवनानुभवः...................................................124
४.१०.९ उर्मिला पवार यांचे जीवनानुभवः....................................................126
४.१०.१० आशा आपराद यांचे जीवनानुभवः...............................................128
४.१०.११ ज्योत्स्ना कदम यांचे जीवनानुभवः ...............................................129
४.१०.१२ उषा दर्डा यांचे जीवनानुभवः.........................................................132
४.१०.१३ मंदाकिनी जाधव-मेहता यांचे जीवनानुभवः ....................................133
४.१०.१४ अलका गोडे यांचे जीवनानुभवः......................................................134
४.१०.१५ सीमा साखरे यांचे जीवनानुभवः ...................................................136
४.११ २१ व्या शतकातील स्त्रीजीवनातील स्थित्यंतरेः .......................................137

प्रकरण 5ः स्त्री आत्मकथनांचे वाङ्मयीन विशेष.......................................141
५.१ भाषा व संस्कृतीः.............................................................................141
५.२ आत्माविष्काराच्या प्रेरणा व भूमिकाः ..................................................143
५.२.१ निवेदनशैली:...................................................................................147
५.२.२ संवादात्मकता:................................................................................152

**५.२.३ आत्मानुभूती: ........................................................................ 156**
**५.३ आत्मकथनांचे वाङ्मयीन मूल्य: ....................................................... 165**
**५.३.१ शब्दसौंदर्य: ...................................................................... 17165**

KRIPA DRISHTI
PUBLICATIONS

Price: ₹375

Kripa-Drishti Publications
A-503 Poorva Heights, Pashan-Sus Road, Near Sai Chowk,
Pune – 411021, Maharashtra, India.
Mob: +91 8007068686
Email: editor@kdpublications.in
Web: https://www.kdpublications.in

ISBN: 978-1-7947-8091-0
9 781794 780910